भाग १

।। चिंतनक्षण ।।

डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

।। चिंतनक्षण ।।

भाग : १

डॉ. सुहास पेठे

एम्.ए., पीएच्.डी. (तत्त्वज्ञान)

* **चिंतनक्षण : भाग-१ ***

पुस्तकरूपाने प्रकाशित सातवी आवृत्ती : सप्टेंबर २०१४

डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com

युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka

अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

साधना करणे हा
माणसाला मिळालेल्या
मर्यादित कर्मस्वातंत्र्याचा
सर्वश्रेष्ठ उपयोग होय.१

नामाचे खरे महत्त्व समजण्यास
मानवी जीवनातील
अपूर्णत्वाची कल्पना येऊन
ते मान्य व्हावयास हवे.२

शरणागती
ही अवस्था आहे,
काही साधण्याचा मार्ग
नव्हे.[३]

बागेत लावलेल्या रोपाची
काळजी घेतो तेवढी तरी आपल्या
साधनेतल्या संकल्पाची काळजी
आपण घ्यायला हवी.४

भक्ताला परिस्थिती
अनुकूल-प्रतिकूल नसते तर
ती भगवंताकडे जायला
फक्त उपयुक्त असते.५

प्रपंच मोडू नये व
परमार्थ सोडू नये, हा
आपला मध्यम मार्ग आहे.[६]

कर्तृत्वाने हरला आणि
ते माणसाला कळले
म्हणजे भगवंताची
कृपाच झाली म्हणायचे.७

साधना म्हणजे
अनेक अडथळ्यांची
सात्त्विक शर्यतच आहे..

वैज्ञानिक दृष्टिकोनाने परमेश्वर जास्तीच सिद्ध झाला आहे.९

कामनेचा भक्त असणे
गैर नाही, पुढे भगवंताचा
भक्त न होणे गैर आहे.१०

नामाच्या चिंतनाची सहा
अंगे - अर्थ, शक्ती, स्थान,
संबंध, प्रयोग, अनुभव.११

परमार्थाचे नुकसान
जेवढे मनाने केले,
तेवढे शरीराने
कधीच केले नाही.[१२]

शब्दशक्तीचा यथायोग्य वापर म्हणजे मौन.१३

नामापेक्षा काही मोठे, हवेसे
वा करावेसे वाटणे
हे वृत्ती गुंतण्याचे लक्षण
समजून सावध राहावे.१४

परमार्थात नित्यशरण तो खरा शरण.१५

व्यवसाय वा नोकरी हे
चरितार्थाचे साधन असावे,
जीवनाचे ध्येय असू नये.[१६]

सत्पुरुषांचे सर्वांवर व सारखेच
प्रेम असते, हे कळायला आणि
पचवायलासुद्धा मोठ्या
साधनेची गरज आहे.१७

परमार्थात दंभ आला
की तो प्रपंचच झाला.१८

परमार्थात प्रगतीसाठी दोन गोष्टी आवश्यक - प्रयोग व प्रतीक्षा.१९

ज्यांना म्हातारपण ही संधी वाटते, त्यांनी तरूणपण योग्य तऱ्हेने घालविले आहे.[२०]

साधना म्हणजे
हरण्याचा अभ्यास होय.[२१]

नाम हे साधन नसून
साध्य आहे,
असे अनुभवाला येईपर्यंत
नाम घ्यावे.२२

एखादी गोष्ट अनुकरणातून
करणे आणि प्रेरणा घेऊन करणे
यांतला फरक ओळखण्यास
आपण शिकले पाहिजे.[२३]

शुद्ध विचारानेसुद्धा
चित्तास प्रसन्न वाटते, तर
ते विचार अंमलात आल्यास
काय होईल ?२४

अपमान ही
साधकाची परीक्षा आहे,
पण मान ही त्याची त्याहून
कठीण परीक्षा आहे.[२५]

प्रार्थना हे
निःशस्त्राच्या हातातले
शस्त्र आहे.२६

अध्यात्मात 'नवीन'
काही होण्याची
शक्यता नाही.[२७]

भगवंतप्राप्तीच्या आपल्या
ध्येयाला अनुकूल असे
जीवन घडवणे म्हणजेच
साधना करणे होय.२८

श्री महाराजांच्या
माणसाला खरी लक्ष्मी
ही 'नामलक्ष्मी'च होय.२९

घरी हरी तो
कशास वणवण करी ?३०

डॉ. सुहास पेठे यांची ही बोधवचने म्हणजे शुद्ध परमार्थमार्गावरील अभ्यासू व्यक्तींना चिंतनाची एक पर्वणीच होय. कारण या वचनांमागे डॉ. पेठे यांचे तीन तपांचे मूलगामी चिंतन, स्वानुभव, अभ्यास, प्रयोग अशी विस्तृत पार्श्वभूमी आहे. शुद्ध परमार्थाचे आकलन व आचरण यांसाठी त्यांची ही वचने आमच्याप्रमाणे इतरांनाही उपयोगी ठरतील म्हणून संकलित व प्रकाशित होत आहेत.

* संतछाया, सातारा *